पुण्य नगरी शनिवार, १५ ऑगस्ट २०२६

# डॉ. रंगनाथन यांचे विचार मोलाचे : हुजरे

**कोल्हापूर :** ई पुस्तके, डिजिटल ग्रंथालये, ऑनलाईन डेटाबेस, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि माहिती तंत्रज्ञानाच्या युगात डॉ. रंगनाथन यांचे विचार अत्यंत मोलाचे आहेत, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त ग्रंथालयाच्या वतीने आयोजित ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. दुपारच्या सत्रात कैलास भालेकर यांनी मार्गदर्शन केले. यासाठी चंद्रकांत खरात, करिअर कौन्सिलिंग सेलच्या प्रमुख डॉ. राजश्री पाटील, ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी संयोजन केले. सूत्रसंचालन डॉ. मृणालिनी देसाई, डॉ. केतकी पाटील यांनी केले. ग्रंथ प्रदर्शनाचे संयोजन बी. ए. नारे, प्रियांका बिडकर, बी. एस. खोत, मंगल गुरव, प्रतीक पानारी, सुरेश इंगळे यांनी केले.